# व्यावसायिक एलपीजीवरील जीएसटी १८ टक्क्यांवरून ५ टक्के करा

## हॉटेल संघटनेची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदनाद्वारे विनंती

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : एलपीजी हा रेस्टॉरंट उद्योगातील महत्त्वाचा घटक आहे. एलपीजीच्या दरात वाढ झाल्याने सर्व जीवनावश्यक वस्तूंचे दरही वाढले आहेत. रेस्टॉरंटमध्ये विकल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थांच्या किमती वाढतील. विशेषत: स्टँडअलोन रेस्टॉरंट्स कमी उत्पन्न असलेल्यांना आणि मध्यमवर्गीयांना परवडणाऱ्या किमतीत खाद्यपदार्थ पुरवितात, त्यांच्यावर अधिक परिणाम होईल. त्यामुळे स्टँडअलोन रेस्टॉरंटसाठी व्यावसायिक एलपीजीवरील जीएसटी १८ टक्क्यांहून ५ टक्के करावा, अशी विनंती हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडियाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदनाद्वारे केली आहे.

हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडियाचे अध्यक्ष शेरी भाटिया म्हणाले की, बहुतेक स्टँडअलोन रेस्टॉरंट्स मध्यम वर्गाला परवडणाऱ्या दरात सेवा देतात. घराबाहेर असताना रोजच्या जेवणासाठी अशा भोजनालयांवर अवलंबून असणारा कामगार वर्ग जेवणावर जास्त खर्च करू शकत नाही. सध्या, व्यावसायिक एलपीजीवर १८ टक्के जीएसटी लागू आहे. स्टँडअलोन रेस्टॉरंटना आयटीसी (इनपुट टॅक्स क्रेडिट) मध्ये सवलत मिळत नसल्याने कराच्या वाढत्या बोजामुळे परिणामी जेवणाची किंमत वाढते. म्हणून आम्ही पंतप्रधानांना विनंती करतो की, स्टॅन्डअलोन रेस्टॉरंटसाठी एलपीजीवरील कराचा दर ५ टक्के करावा, जेणेकरून आम्ही लोकांना किफायती दरात जेवण उपलब्ध करून देऊ शकू. गेल्या दोन वर्षांत एलपीजीच्या किमतीत रु. ४०० ते ५०० वाढ झाली आहे. एलपीजी सिलिंडरच्या किमतीतील वाढीबरोबरच डिझेल आणि पेट्रोलच्या दरामध्ये सातत्याने होणारी वाढ, यामुळे वाहतुकीच्या खर्चातही वाढ होत आहे.

> सरकारला हे माहीत आहे की, स्टँडअलोन रेस्टॉरंटदेखील मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण करतात. या उद्योगात स्टँडअलोन रेस्टॉरंट्समध्ये निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी आणि गुंतवणुकीचे प्रमाण इतर कोणत्याही उद्योगापेक्षा खूप जास्त आहे. आम्ही सरकारला विनंती करतो की, आम्हाला समजून घ्या आणि एलपीजीमधील ही महागाई कमी करण्यासाठी आणि त्याचा खाद्यपदार्थांच्या किमतींवर होणारा परिणाम टाळण्यासाठी स्टॅन्डअलोन रेस्टॉरंट्सना मदत करा.
>
> \- **प्रदीप शेट्टी**, वरिष्ठ उपाध्यक्ष, हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया